# शेती विकासात कृषि सेवा केंद्राची भूमिका

**प्रा. श्वेता मयेकर**
सहाय्यक प्राध्यापिका (विस्तार शिक्षण विभाग)
कृषि महाविद्यालय, फोंडाघाट, डॉ.बा.सा.कों.कृ.वि., दापोली

शेतीच्या विकासात कृषि सेवा केंद्राची भूमिका महत्त्वाची असून ग्रामीण भागापर्यंत आधुनिक शेतीची साधने व तंत्रज्ञान पोहोचविण्यासाठी प्रत्येक गावा त कृषि सेवा केंद्र उपलब्ध असते. याद्वारे शेतकऱ्यांना संकरित बियाणे, विविध प्रकारची खते, कीटकनाशक व रोगनाशक औषधे, अवजारे, सूक्ष्म अन्नद्रव्ये, संप्रेरके, रोपे, इत्यादी विक्री केली जाते.

## आदर्श कृषि सेवा केंद्र म्हणजे काय?

ढोबळमानाने याची व्याख्या अशी की, कृषि निविष्ठांबाबत ग्राहकांना योग्य सल्ला देणे, निविष्ठांची वर्गवारी करून योग्य पद्धतीने ज्या कृषि सेवा केंद्रातून निविष्ठा विक्री किंवा प्रदान केला जातात अशा केंद्रास आदर्श कृषि सेवा केंद्र असे म्हणतात.

## आदर्श कृषि सेवा केंद्राची निवड:

आपल्या भागातील कोणते कृषि सेवा केंद्र आदर्श कृषि सेवा केंद्र आहे याची माहिती आपणास संबंधित कृषि सेवा खात्यातील मंडळ अधिकारी, तालुका कृषि सेवा अधिकारी, जिल्हा परिषदेच्या तालुक्याच्या कृषि सेवा विस्तार अधिकारी यांच्याकडे प्राप्त होईल. त्याचप्रमाणे आदर्श कृषि सेवा केंद्राची निवड करण्यासाठी दुसरे कोणतेही सर्वसाधारण कृषि सेवा केंद्र निवडावे. अशा प्रकारे दोन्हीही कृषि सेवा केंद्राची निवड पुढील बाबींसाठी करावी.

- कृषि सेवा केंद्राची जागा.
- कृषि सेवा केंद्रामधील पुढील निविष्ठांची मांडणी. (बी-बियाणे, खते, अन्नद्रव्ये, संप्रेरके, कीटकनाशके, बुरशीनाशके, छोटी हत्यारे, औजारे, मशिनी, रोपे व इतर साहित्य)
- कृषि सेवा केंद्रामधील कार्यरत नोकर व व्यवस्थापकांचे प्रशिक्षण
- कोणकोणत्या निविष्ठांना प्राधान्य
- निविष्ठा कोठून खरेदी करतात
- खरेदीसाठी कोण जातो? किंमतीमध्ये काही कमी जास्ती करतात काय?
- निविष्ठांची वाहतूक कशाने करतात? वाहतुकीमध्ये होणारे नुकसान, खर्च, इत्यादी.
- निविष्ठा खरेदीची ऑर्डर किती अगोदर द्यावी लागते? नसल्यास, पाहिजे त्या निविष्ठा बी-बियाण्यासहीत ताबडतोब मिळतात का?
- सर्व निविष्ठा खरेदी, नियोजन कसे केले जाते?
- शेतकरी त्यांची निविष्ठांची मागणी अगाऊ नोंदवितात काय?
- शेतकऱ्यांना निविष्ठा विक्रीबरोबर इतर सल्ला दिला जातो का?
- शेतकऱ्यांना हवे ते बी-बियाणे, खते, रासायनिक कीटकनाशके, सूक्ष्म अन्नद्रव्ये, औजारे, इत्यादी आपल्याकडे उपलब्ध असतात काय? नसल्यास कशा प्रकारे शेतकऱ्यांचे समाधान केले जाते?
- शेतकऱ्यांसाठी मेळावे, प्रदर्शने, प्रात्यक्षिके, सहली, इत्यादींचे आयोजन करता काय? त्याबद्दल शेतकऱ्यांची मते काय आहेत?
- आर्थिक नियोजन करताना आपणास काही अडचणी येतात काय? स्वत:चे व कर्जरूपाने किती भांडवल आपणास सुरुवातीस लागेल? आताची परिस्थिती काय आहे?
- कृषि सेवा उद्योगात भांडवल जास्त प्रमाणात आणि जास्त काळ गुंतून राहते की त्याची उलाढाल होत राहते?
- व्यवस्थापनाचा मोबदला आपणास मिळतो किंवा नाही?
- कृषि सेवा खात्याचे अधिकारी, कृषि सेवा विद्यापीठांचे शास्त्रज्ञ, पीक विशेषज्ञ यांच्याशी आपण संपर्क ठेवता काय? त्यांचा कृषि सेवा केंद्र व्यवस्थापनेत उपयोग होतो किंवा नाही.

अशाप्रकारे आपण आपल्या भागातील आदर्श कृषि सेवा केंद्राची निवड करताना वरील बाबींचा विचार करावा. ज्यामुळे शेतीसाठी लागणाऱ्या विविध प्रकारच्या कृषि निविष्ठांची गुणवत्ता व विश्वासार्हता समजून घेता येईल त्याप्रमाणे शेतकऱ्यांना कृषि निविष्ठांची खरेदी करता येणे सोयीस्कर होईल.

## कृषि सेवा केंद्रामुळे होणारे फायदे:

- शेती व्यवसाय करत असतांना शेतकरी बांधवांना विविध कृषि निविष्ठांची गरज हंगामानुसार सतत पडत असते. ह्या सर्व निविष्ठा संबंधित जवळील कृषि सेवा केंद्राकडून शेतकऱ्यांना प्राप्त होत असतात.
- कृषि सेवा केंद्रामुळे शेतकऱ्यांना नवनवीन कृषि निविष्ठा उपलब्ध होतात.
- विविध पीक पद्धतीनुसार पिकांची लागवड व संगोपन करण्यासाठी शेतकऱ्यांना संबंधित कृषि सेवा केंद्राकडून मार्गदर्शन मिळते.
- शेतकऱ्यांना पिकाचे उत्पादन घेण्यासाठी तसेच शेतीचा विकास साध्य करण्यासाठी कृषि सेवा केंद्राची गरज भासते. त्यामुळे या केंद्रातून विविध कृषि सेवा व निविष्ठा प्रदान केल्या जातात. ज्यामुळे या निविष्ठांचा शेतकऱ्यांना शेतीसाठी उपयोगी करता येतो.

- स्थानिक ठिकाणी शेतकऱ्यांना बी-बियाणे, रासायनिक खते व औषधे उपलब्ध झाल्यामुळे शेतकऱ्यांना याचा फायदा होतो. यासाठी वेगळया भटकंती करावी लागत नाही.
- शेतीच्या हंगामानुसार तसेच वेगवेगळया पीक पद्धतीनुसार कृषि निविष्ठांची गरज भासते. त्याप्रमाणे कृषि सेवा केंद्रचालक हे शेतकऱ्यांना मागणीनुसार वितरीत करीत असतात. त्यामुळे विक्रेता व शेतकरी यांच्यामध्ये एकप्रकारे सलोख्याचे संबंध प्रस्थापित होण्यास मदत होते.
- शेतकऱ्यांना आर्थिक निकडीपोटी कृषि निविष्ठांची गरज भासल्यास सलोख्याच्या संबंधामुळे त्यांना वेळेवर खते, बियाणे व औषधे उपलब्ध होतात.
- शेतकऱ्यांचा वेळ व खर्चात बचत होते.
- शेतकऱ्यांना कृषि निविष्ठांबाबत माहिती मिळणे सुलभ होते.
- कृषि सेवा केंद्रधारक हा पदवीधर असल्यास किंवा शेती विषयाचे ज्ञान असणाऱ्या व्यक्तींकडून शेतकऱ्यांना योग्य सल्ला व मार्गदर्शन मिळते.
- शेतकऱ्यांच्या पिकासंबंधी समस्येनुसार त्यांना योग्य मार्गदर्शन व समुपदेशन हे केंद्रचालक करतात.
- शेतीचा विकास होऊन शेतकऱ्यांचे आर्थिक सबलीकरण होण्यास मदत होते.
- कृषि पदविका व कृषि पदवीधर विद्यार्थ्यांना एक रोजगाराचे साधन उपलब्ध होते.

अशाप्रकारे आदर्श कृषि सेवा केंद्राची निवड करून शेतकऱ्यांनी अशा कृषि सेवा केंद्रातूनच कृषि निविष्ठा खरेदी करावयाच्या आहेत. त्यामुळे शेतकऱ्यांना योग्य सल्ला व मार्गदर्शन मिळेल, त्यांच्या समस्येचे निराकरण होईल, पीक वाढीच्या अवस्थेनुसार औषधांची माहिती मिळेल, त्यांची फसवणूक होणार नाही व इतर आवश्यक फायदे आदर्श कृषि सेवा केंद्रातून खरेदी केलेल्या निविष्ठामुळे होत असते.

### कृषि केंद्र परवाण्यासाठी शैक्षणिक अहर्ता निश्चित:

कृषी केंद्र, खत आणि कीटकनाशक विक्री, उत्पादन, साठवणूक, वितरणासाठी परवाना पाहिजे असल्यास बी.एससी. कृषी, कृषी रसायनशास्त्र पदवीधर, कृषीशास्त्र विषयातील पदविका, बी.एससी. रसायनशास्त्र स्नातकोत्तर पदवीसह पीएच.डी. किंवा अभियांत्रिकी रसायनशास्त्राची पदवी ही शैक्षणिक अर्हता अनिवार्य करण्यात आली आहे. राज्यातील खत आणि कीटकनाशक परवानाधारकांकडे यापैकी एकही पदवी नसेल, तर दोन वषार्ंच्या आत ही शैक्षणिक अर्हता त्यांनी पूर्ण करण्याचा अध्यादेश राज्याच्या कृषी संचालकांनी काढला आहे; अन्यथा परवाना रद्द करण्यात येणार आहे. राज्यात कुठेही कृषी केंद्र सुरू करायचे असेल, तर पहिले किमान कृषी पदविका ही अर्हता ग्राह्य धरली जात होती. नंतर ती शिथील करण्यात आली. मात्र, कृषी आयुक्तालयाचे कृषी संचालक (निविष्ठा व गुणनियंत्रक) जयंत देशमुख यांनी नुकतीच एक अधिसूचना काढली आहे. कीटकनाशकांचे उत्पादन, विक्री, साठवणूक, विक्रीकरिता प्रदर्शित करणे, वितरण करणे यासाठी तांत्रिक श्रेणी असलेल्या कीडनाशकांच्या उत्पादन परवान्यासाठी अर्ज करणाऱ्यांकडे रसायनशास्त्राच्या स्नातकोत्तर पदवीसह पीएच.डी. किंवा अभियांत्रिकी रसायनशास्त्राची पदवी अनिवार्य करण्यात आली आहे.

### कृषि सेवा केंद्र सुरु करण्यापूर्वीची तयारी:

- सर्वात प्रथम तुमच्या कडे अँग्रीकल्चर पदवी/पदवीका झालेले सर्टीफिकीट हवे.
- ज्या गावामधे चालु करताय तिथला ग्रामपंचायत नाहारकत दाखला.
- ज्या दुकान किंवा गाळ्यामधे व्यवसाय चालवनार तो जर भाडेतत्वावरती असेल तर तस अँग्रीमेंट ( कमीत कमी ११ महिने)
- तुम्ही खते व ओषधे देन्ही विक्री करनार असाल तर तशी दोन्हीचा परवाना वेगवेगळा घ्यायला लागेल.
- जिल्हा उद्योग केंद्राची परवानगी तसेच तिथील जिल्हा परिषद कृषी विभागाची ही परवानगी.
- अशा वरील गोष्टी महत्वाच्या आहेत, पन त्यापेक्षाही व्यवसाय चांगला करायचा असेल तर शेतीविषयक नाॅलेज, फील्ड विजीट करायची तयारी हवी.

★ ★ ★

(संपर्क: +९१ ९१४६९७०७५०)

### सेंद्रिय शेती प्रमाणीकरण यंत्रणा

सेंद्रिय शेतीपद्धतीचे प्रमाणीकरण करणाऱ्या संस्था शक्यतो बिगर शासकीय यंत्रणा असतात. खालील प्रमाणीकरण यंत्रणांना आतापर्यंत मान्यता देण्यात आली आहे.

- इन्स्टिट्यूट ऑफ मार्केटलॉजी, ७८ पहिला मजला, ११ क्रॉम, इंदरानगर, १ स्टेज, बंगलोर
- एस.के.एल. इंडिया ३ रा मजला, मोनार्च चेंबर्स, १२२ इनफटरी रोड, बंगलोर
- *इकोसर्ट-इंटरनॅशनल कोरस्टर स्ट्रे ८७ डी-३७५२०, ओस्टॅरोड, जर्मनी*
- भारतातील कार्यालय-औरंगाबाद (महाराष्ट्र), गुरगाव हरियाणा
- एस.जी.एस. इंडिया प्रा.लि. २५०,उदयोगविहार, फेज-४ गुरगाव (हरियाणा)
- *इन्डोसर्ट इंडियन ऑरगॅनिक सर्टिफिकेशन एजन्सी, केरळ*
- सर्ग विकास समिती, नैनीताल
- नोका, पुणे